**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, APR-MAY, 2019, VOL- 7/33*

# शिक्षणात कलांचे उपयोजन

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Abstract**

*साहित्य संगीत नृत्य, नाट्य चित्रकला, वादन, गायन अशा विविध कला प्रकारांचा मानवी जीवनाशी घनिष्ठ संबंध असतो. विविध कला मानवी मनाला आनंद देण्याचे काम करतात. तसेच कलेद्वारे मानवी जीवन समृद्ध होते. जीवन जगत असताना विविध कला प्रकारांच्या सादरीकरणामुळे आणि आस्वादामुळे मानवाला आनंद, सुख, समाधान, यश, प्रतिष्ठा, कीर्ती यांची प्राप्ती होत असते. प्राचीन काळापासून कला व मानवी जीवन यांचे नाते अतूट असल्याचे दिसून आलेले आहे. विविध कला जोपासण्याचे, कलांचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे काम मानवालाच करावे लागते. सामाजिक, धार्मिक, राजकीय या क्षेत्रांमध्ये जेवढे कलांना महत्व आहे तेवढेच महत्त्व शिक्षण क्षेत्रामध्येही आहे. म्हणूनच अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी, यशस्वी, अर्थपूर्ण व आनंददायी करण्यासाठी शिक्षणात विविध कलांचा समावेश करण्यात आलेला आहे.*

***की वर्ड:*** *शिक्षण, परफॉर्मिंग आर्ट्स / प्रायोगिक कला*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1) प्रस्तावना

मानवी मनाला जीवनात तोच तोच पणा नको असतो. एकसुरीपणामुळे मानवाला जीवन जगणे कंटाळवाणे होते. रोजचे दैनंदिन व्यवहार, जबाबदाऱ्या, कर्तव्य पार पाडीत असताना माणूस थकून जातो. जीवन जगत असताना माणसाच्या आयुष्यात अधून मधून एक टप्पा असा येतो की, जीवन फारच निरस व रुक्ष वाटायला लागते. या टप्प्यावर मानवी मनाला आलेला थकवा व मरगळ झटकून, मनाला प्रसन्नता व तजेला, विरंगुळा मिळण्याची गरज असते. मनाला आलेला थकवा घालवून, मनाची मरगळ झटकून, मनाला प्रसन्नता, समाधान व ऊर्जा देण्याचे काम विविध प्रकारचे कलाप्रकार करीत असतात. आपले जीवन आनंददायी व उत्साही बनविण्यासाठी मानवाला कोणत्या ना कोणत्या कलेचा छंद व आवड असावी लागते. कलेची आवड नसणाऱ्या माणसास अरसिक व असंस्कृत म्हटले जाते.

शिक्षण आणि कला याचाही फार जवळचा संबंध आहे. गरजेनुसार कौशल्यपूर्वक विविध कलांचा शिक्षणात उपयोग करून घेतल्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी अध्यापन अध्ययन प्रक्रिया अत्यंत आनंददायी होते. शिक्षण आणि कला त्यांचा समन्वय साधल्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा यामध्ये वाढ होते. कोणत्याही राष्ट्राचा दर्जा त्या राष्ट्रात दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असतो.

शिक्षणाचा दर्जा वाढला तर जागतिक स्तरावर आपोआपच त्या राष्ट्राचा दर्जाही वाढतो. या सर्व मुद्द्यांचा विचार करून 2005 च्या आणि 2014 च्या राष्ट्रीय शिक्षण शिक्षक परिषदेच्या दोन वर्षांच्या बी एड अभ्यासक्रम आराखड्यामध्ये औपचारिकरित्या प्रभावी शिक्षणासाठी शिक्षणामध्ये विविध प्रकारच्या कला प्रकारांचा प्रवेश करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. शिक्षण कला की शास्त्र या मुद्द्यावरही शिक्षण तज्ञांमध्ये व विचारवंतांमध्ये बरीच चर्चा झालेली आहे. शिक्षण कला की शास्त्र या चर्चेमधून शिक्षण शास्त्रही आहे व कलाही आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. शिक्षक हा सुद्धा एक कलाकार असतो. शिक्षकाला चांगला शिक्षक होण्यासाठी कलाकाराच्या अंगी जे गुण असतात तेच गुण शिक्षकांचाही अंगी असावे लागतात. प्रभावी अध्यापनासाठी शिक्षकास पेहराव, हावभाव, आवाजातील चढ-उतार, संवाद फेक, संवादाची गती, नेत्र कटाक्ष, देहबोली या मुद्द्यांचा विचार करावा लागतो. चांगला शिक्षक एक उत्तम नट असतो असेही म्हटले जाते.

मानवी मन चंचल असल्यामुळे विद्यार्थ्यांचे अवधान एका विषयावर फार काळ केंदित होऊ शकत नाही. तसेच मानवी मनाचा स्वभाव सतत नाविन्याचा शोध घेणे असा असल्यामुळे विद्यार्थ्यांनाही अध्ययन-अध्यापन पद्धतीमध्ये सतत काहीतरी नवनवीन गोष्टी, तंत्रे व पद्धतींची आवश्यकता वाटत असते. अध्ययन अध्यापनामध्ये नाविन्य व विविधता आणण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांना शिक्षणात विविध प्रकारच्या कलांचा गरजेनुसार योग्य प्रकारे वापर करून घेता येतो.

**2) कार्यात्मक व्याख्या**

➢ **शिक्षण**

शाळा महाविद्यालय विश्व विद्यालयांमध्ये ज्ञान, मूल्य, कौशल्य शिकविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. चांगल्या वर्तन विषयक सवयी लावण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. विद्यार्थ्यांमध्ये कायमस्वरूपी टिकाऊ स्वरूपाचा सकारात्मक प्रकारचा होणारा वर्तन म्हणजे शिक्षण.

➢ **परफॉर्मिंग आर्ट्स / प्रायोगिक कला**

रसिकांना विविध भाव रसांची अनुभूती देणारे सृजनात्मक कृतीयुक्त सादरीकरण म्हणजे कला.

**3) कलांचे प्रकार**

➢ **दृश्यकला**

उदा.चित्र रेखाचित्र, क्ले, क्रेयॉन्स, कोरडे व जलरंग वापरून चित्रे, रांगोळी, कोलाज, हस्तकला, मातीकाम, काचेवरील कलाकुसर विणकाम, भरतकाम, शिल्पकला, मूर्तिकाम.

➢ **प्रायोगिक कला**

गायन, वादन, नृत्य, संगीत, नाट्य, चित्रपट, कळसूत्री बाहुल्या, जादूचे प्रयोग, सर्कस, विविध लोककला.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**4) कलेची वैशिष्ट्ये**

➢ कला निर्मितीसाठी कल्पना प्रतिभा व सृजनशीलतेची आवश्यकता असते.

➢ कला सादरीकरणासाठी कलाकारांची आवश्यकता असते.

➢ कलेमध्ये कलाकाराकडून विविध प्रकारच्या कौशल्ययुक्त कृती होत असतात.

➢ कलेमध्ये सादरीकरणाला खूप महत्व असते.

➢ कलेचा आस्वाद घेण्यासाठी रसिक प्रेक्षक उपस्थित असावे लागतात.

➢ रसिकांना भाव रसांची अनुभूती देणे हा कोणत्याही कला प्रकाराचा मुख्य हेतू असतो.

➢ कलांचा आस्वाद घेण्यासाठी प्रेक्षक सहृदय, संवेदनक्षम व रसिक मनाचा असावा लागतो.

➢ कला सादरीकरणाला प्रसंगी रसिकांकडून कलाकारांना मिळालेली उत्स्फूर्त दाद कलाकारांचा उत्साह, ऊर्जा व उमेद वाढवीत असते.

➢ कल्पना, प्रतिभा व सृजनशीलतेच्या माध्यमातून निर्माण होणारी एकमेवाद्वितीय कलाकृती विश्वविख्यात व अजरामर ठरते.

➢ कलांमुळे पाच ज्ञानेंद्रियांना आनंद मिळून मन, मेंदूला ताजेपणा प्राप्त होतो.

**5) शिक्षणात कलेची उद्दिष्टे**

➢ कलेची संकल्पना स्पष्ट करणे.

➢ विविध कला प्रकारांची मूलभूत माहिती देणे.

➢ विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक व सौंदर्यात्मक दृष्टीचा विकास करणे.

➢ कलेतील ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, वैज्ञानिक दृष्टिकोनाची माहिती देणे.

➢ देशातील उच्च सांस्कृतिक वारसा याबाबतच्या जागरूकतेचा विकास करणे.

➢ शिक्षणात कलेचे उपयोजन करण्याच्या कौशल्याचा विकास करणे.

➢ विविध कला प्रकारांचा शिक्षणात उपयोग करून घेण्याबाबत माहिती देणे.

➢ विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकास घडवून आणणे.

➢ नृत्य, गायन, वादन, साहित्य, संगीत, कला, नाट्य, चित्रपट याविषयी आवड निर्माण करून त्यांचा रसास्वाद घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

**6) शिक्षणात कलेची गरज**

➢ विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकास करण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांचा बौद्धिक, भावनिक, मानसिक विकास करण्यासाठी.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

➢ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांमध्ये समन्वय व सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी.

➢ जुन्या पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये बदल करण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांच्या भावनांना वाट देऊन त्यांना आत्म प्रकटीकरणाची संधी देण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमतांचा विकास करून त्यांना कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी.

➢ विद्यार्थ्यांना योग्य प्रकारच्या अध्ययन वातावरणाची निर्मिती करण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांना सहकार्य अध्ययनाची सवय व गोडी लावण्यासाठी.

➢ विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण करण्यासाठी.

➢ अर्थपूर्ण आनंददायी अध्यापन अध्ययनासाठी.

➢ विद्यार्थ्यांना संवेदनक्षम जबाबदार नागरिक घडविण्यासाठी.

**7) शिक्षणात कलेचे महत्त्व**

➢शिक्षणात कलांचा उपयोग करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनात सुधारणा होते.

➢ विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्याचा विकास होतो.

➢ शिक्षण व कला यांचा समन्वय साधल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनात्मक बहुदिश विचाराद्वारे समस्या निराकरण क्षमतेचाचा विकास होतो.

➢ एखाद्या विषयाची संकल्पना सखोलपणे समजण्यासाठी शिक्षणात कलेचा वापर सहाय्यक ठरतो.

➢ शिक्षणात कलेच्या वापरामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाद्वारे शिकण्याची संधी प्राप्त होते.

➢ शिक्षणात योग्य प्रकारे कलेचा उपयोग करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय विषयांचा परस्परांशी असलेला संबंध तसेच शिक्षण व कलांचा, कलेचा जीवनाशी असलेला संबंध लक्षात येतो.

➢ शिक्षणात कलांचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमता व आवडीनुसार आनंदाने विषयांचे अध्ययन करता येते.

➢ शिक्षणात कलेचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल व जिज्ञासा वृत्ती निर्माण होऊन ते नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी तसेच नवीन विचार करण्यासाठी तयार होतात.

➢ शिक्षण व कला यांचा योग्य प्रकारे समन्वय साधल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्य सहानुभूती, आपुलकी, प्रेम जिव्हाळा, खिलाडूवृत्ती या गुणांचा विकास होतो.

➢ शिक्षणात कलेचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचा ताण व दडपण वाटत नाही. विद्यार्थी हसत खेळत आनंदाने एकमेकांच्या सहकार्याने विद्यार्जन करतात

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

➢ शिक्षणात कलेचा उपयोग केल्यामुळे विद्यार्थ्यांचे ताण कपाती करण होऊन त्यांना तणाव मुक्त जीवन जगता येते.

➢ विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमतांचा विकास होऊन त्यांचे शैक्षणिक संपादन वाढून शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता यामध्ये वाढ होते.

➢ शिक्षणात कलेचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांमधील निर्णय घेण्याच्या क्षमतेचा विकास होऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व्यवसाय क्षेत्राची निवड करता येते.

**8) शिक्षणात कलेच्या उपयोजना साठी उपक्रम**

➢ भूगोल या विषयात प्रदूषण हा घटक शिकविताना पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक प्रभावीपणे होईल तसेच यासाठी एखादी शॉर्ट फिल्म ही उपयुक्त ठरेल.

➢ विज्ञान या विषयात हृदयाची रचना व कार्य या घटकाचे अध्यापन करताना एखाद्या विद्यार्थ्यांची निवड करून मी हृदय बोलतोय असा विषय देऊन त्या विद्यार्थ्याकडून एकपात्री अभिनय करून घेता येईल.

➢ इतिहास या विषयात पाठातील काही निवडक प्रसंगाचे संवादामध्ये रूपांतर करून, विद्यार्थ्यांमध्ये तशी पात्रयोजना करून, नाट्यीकरण, अभिनयाद्वारे पाठ्य घटक रंजकपणे स्पष्ट करता येईल. इतिहास या विषयात विद्यार्थ्यांना गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती, पोस्टर्स बनविण्यास सांगता येते.

➢ गणितासारख्या विषयांमध्ये कलेमध्ये गायन, वादन संगीतामध्ये वापरण्यात येणारी विविध प्रकारची वाद्य व त्यांचा आकार यांची उदाहरणे देऊन वर्तुळ, चौकोन, त्रिकोण या घटकांचे चांगल्या प्रकारे अध्यापन करता येईल.

➢ मराठी, हिंदी, इंग्रजी यांसारख्या भाषा विषयांमध्ये एखाद्या पाठावर आधारित विद्यार्थ्यांना स्क्रिप्ट लिहिण्यास सांगता येते.

➢ भारतातील विविध राज्य सांगताना त्या त्या राज्यातील वेशभूषानुसार विद्यार्थ्यांना नृत्याची संधी देता येते.

➢ योग्य त्या वस्तूंचा व रंगांचा वापर करून विद्यार्थ्यांना पोस्टर्स, चार्ट, प्रतिकृती, चित्र आकृती, यांसारखी आपल्या विषयाला अनुसरून आकर्षक अध्यापन साधने तयार करण्यास सांगता येतात.

➢ काव्याचे अध्यापन करताना एखाद्या कवितेला चाल लावून तालासुरात कवितेचे गायन करून प्रभावीपणे कवितेचे अध्यापन करता येते.

➢ इतिहासाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना पोवाडा गायन व देशभक्तीपर गीत गायन करण्यास सांगता येते.

➢ शालेय परिपाठाच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थना तालासुरात विद्यार्थ्यांना गायन करण्यास सांगून प्रार्थनांचा परिणाम चांगल्या प्रकारे साधता येतो.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

➢ शालेय परिसरात व भोवताली उपलब्ध असणाऱ्या वस्तू, शंख, शिंपले, पाने-फुले, काड्या विशिष्ट आकाराचे लाकूड, पक्षांची पिसे वापरून विद्यार्थ्यांना शोभेच्या वस्तू बनविण्यास सांगता येते व त्याचे प्रदर्शन ते भरविता येते.

➢ चित्रकला, रांगोळी, गीत गायन, नृत्य, लोकनृत्य, लोकगीत गायन, एकपात्री अभिनय, मूक अभिनय, काव्यवाचन व काव्यलेखन, कथाकथन यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करूनही विद्यार्थ्यांना कलेविषयी आवड निर्माण करता येते.

➢ नट, गायक, वादक, चित्रकार, मुलाखतकार, शिल्पकार, मातीपासून कलाकुसरीच्या वस्तू तयार करणारे कलाकार तसेच लाकूड काच कापड धातू यावर कलाकुसर करणारे कलाकार यांना शाळेमध्ये आमंत्रित करून त्यांच्या कलांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांपुढे सादर केल्यास विद्यार्थ्यांना कलेविषयी आवड निर्माण होते.

➢ गड किल्ले, लेणी, ऐतिहासिक ठिकाणे, भौगोलिक ठिकाणे, वस्तुसंग्रहालय, चित्रकला, हस्तकला, संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट यांसारख्या कलांचे शिक्षण देणाऱ्या संस्थांना विद्यार्थ्यांना भेटी देण्यासाठी घेऊन गेल्यावरही विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारच्या कलांविषयी आवड निर्माण होते.

➢ दर्जेदार नाटक, चित्रपट, अवॉर्ड विनिंग शॉर्ट फिल्म, फिल्म फेस्टिवल याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगून, नाटक चित्रपटांचा आस्वाद घेऊन त्यावर चर्चा करून विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयी आवड निर्माण करता येते.

➢ विविध ठिकाणी होणाऱ्या अभिनय प्रशिक्षण कार्यशाळांची माहिती सांगून, तानपुरा ॲप वर गायनाचा सराव करता येतो तसेच कराओके ॲपवर विविध भाषेतील गाणी म्हणता येतात ही माहिती सांगूनही विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड निर्माण करता येते.

## संदर्भ

*Deva, B.(1981). **An Introduction to Indian Music**. Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India.*

*Doshi, S. (1982).**The Performing Arts**. Marg Publications, Mumbai.*

*Das, V.( 1992).**Traditional Performing Arts – Potentials for Scientific Temper**. Wiley Eastern Limited, New Delhi.*

*Davis, J. (2008). **Why our schools need the arts**. Teachers College Press, New York.*

*Srivastava, H.(2006). **Curriculum and methods of teaching**. Shipra Publishers, New Delhi.*

*NCTE (2006). **Position Paper on Arts, Music, Dance And Theatre** by National Council of Educational Research And Training, New Delhi.*

*NCTE (2015) **Frame work for Two years B.Ed. Programme** by National Council Of Educational Research And Training, New Delhi.*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*